**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
Vol - VI Issue - VII JULY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाचे सहकारी गोदाम कार्यातील योगदान अभ्यासने

**डॉ. अरुण बळीराम धालगडे**
विभागप्रमुख, वाणिज्य विभाग,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

### प्रस्तावना-

रा.स.वि.नी.ची स्थापना १९६३ मध्ये संसदेच्या एका विशिष्ट कायद्याव्दारे कृषी मंत्रालयाच्या अंतर्गत एका वैधानिक प्राधिकरणाच्या रुपात केली गेली आहे. महामंडळाच्या धोरण व कार्यक्रमाचे निर्धारण करण्यासाठी महामंडळाचे ५१ सदस्यीय संचालक मंडळ व दैनंदिन कार्य करण्यासाठी एक १२ सदस्यीय व्यवस्थापन मंडळ म्हणून कार्य करते. त्याचे प्रमुख कार्यालयाव्यतिरिक्त रा.स.वि.म. १८ राज्य विभागीय कार्यालयाद्वारे कार्य करते. कार्यकारी संचालक हे या कार्यालयाचे प्रमुख आहेत व त्यांच्या नियंत्रणाखाली विविध विभागांची कार्ये केली जात आहेत. विभागीय कार्यालयांच्या योजना निश्चित करणे व त्यांच्या अंमलबजावणीची तयारी करण्यामध्ये यांची महत्वपूर्ण व मुख्य भूमिका निभावित असते. योजनांची निवड करणे व निवडलेल्या योजनाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी सहकारी संस्थांना आर्थिक साहाय्य देण्यासाठी रासविनीनी सहकारी संघटन पध्दती, आर्थिक व्यवस्थापन अंतर्गत साखर, तेल, मत्स्य व्यवसाय, लघु कापड उद्योग, स्थापत्य अभियांत्रिकी व शितगृह ह्या क्षेत्रासाठी महामंडळातर्फे तांत्रिक व व्यवस्थापकीय मार्गदर्शनासाठी सक्षम आहे.

### संशोधनपत्राचे उद्देश-

१. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची गोदाम क्षेत्राविषयीची माहितीचा अभ्यास करणे.
२. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाचे गोदाम कार्यातील योगदान चा आर्थिक अभ्यास करणे.

### माहिती संकलनाचे स्त्रोत-

१. संशोधनपत्रासाठी संदर्भग्रंथ, वार्षिक अहवाल व वेबसाईट इ. दूय्यम माहितीचा आधार घेतलेला आहे.

कृषि उत्पादन, खाद्यान्न, अन्य वस्तू, औषधी किटकनाशक, शेतीयंत्र, केरोसीन, कापड, रबर इ. उत्पादनांवर प्रक्रिया विपणन, साठवणूक, निर्यात व आयातीच्या कामाचे नियोजन, संरक्षण व अर्थ संवर्धन करणे आणि सहकारी तत्वाने ग्राहकांना वस्तूंचा पुरवठा करणे या अंतर्गत कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मासेमारी, रेशीम उद्योगासारखा उद्योग, इ. लघु

उद्योगांना संवर्धित करणे, लघु उद्योगातून उत्पादन झालेल्या उत्पादनाचे एकत्रिकरण करणे, त्यावर प्रक्रिया करणे, त्याचे व्यवस्थित विपणन करणे, त्यांची योग्य साठवणूक व

नियोजनबध्द निर्यात करणे हे कार्यसुध्दा रा.स.वि.म. ची महत्वाची आहेत. रा.स.वि.म. कायद्याअंतर्गत काही संशोधन केले गेले ज्यामध्ये विविध प्रकारच्या सहकारी क्षेत्राला सहकार्य करण्याच्या हेतुने महामंडळाचे क्षेत्र विस्तारीत करून वित्तीय अर्थसहाय्याचा विस्तार करण्यात आला आहे. रा.स.वि.म. आता ग्रामीण औद्योगिक सहकारी क्षेत्र, जलसंवर्धन, सिंचन लघुसिंचन शेती-विमा शेतीकर्ज ग्रामीण स्वच्छता पशु (स्वास्थ्य) आरोग्य इ. ग्रामीण भागातील सहकारी क्षेत्रातील सेवाच्या हेतुने प्रकल्पांना आर्थिक साहाय्य करू शकत आहे.

प्राथमिक पायाभूत व दुय्यम स्तरावरील सहकारी संस्थांना आर्थिक प्रगतीसाठी राज्य सरकारांना कर्ज व अनुदान दिले जाते तसेच राज्याबाहेर व्यवसाय करणा-या राष्ट्रीय स्तरावरील सहकारी संस्थांना आणि अन्य संस्थांना प्रत्यक्ष कर्ज व अनुदान दिले जात आहे. हे महामंडळ नियम व अटींचे पालन करणा-या संस्थांना विविध योजने अंतर्गत प्रत्यक्ष अर्थसाहाय्य सुध्दा करु शकते.[१]

**सहकारी साठवणूक :** कृषि सहकारांमध्ये शेतक-यांना कृषि गुंतवणूक व विविध तांत्रिक सेवांची पुर्तता करून शेती उत्पादन वाढ करण्याची महत्वाची भूमिका महामंडळ पार पाडीत आहे. सहकारी क्षेत्रातील शेतक-यांच्या अतिरीक्त उत्पादनाची खरेदी करणे, प्रतवारी, प्रक्रिया, साठवणूक आणि विपणन इ. हेतूने उत्पादनानंतर सेवाही प्रदान करीत आहे. सहकारी ग्रामीण क्षेत्राच्या गरजांची पुर्तता करीत आहे. तसेच आवश्यक वस्तूचे ग्राहकांना वितरण करीत असताना समान रुपात फायदेशीर सेवाही प्रदान करीत आहे. अशा आवश्यक गरजा पूर्ण करण्याच्या हेतुने राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ ग्रामीण स्तरावरील प्राथमिक सहकारी समितीना साहाय्य करीत आहे. या व्यतिरिक्त हे महामंडळ स्वत:ची साठवणूक सुविधा प्रदान करण्याच्या हेतूने गोदामाची निर्मिती करणे, सध्याच्या साठवणूक क्षमतेचा विस्तार करणे आणि ग्रामीण भागातील गोदामांचे नविनीकरण करण्याच्या हेतुने केंद्राने

ठरविलेल्या योजनानुसार ग्रामीण बाजार, जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर कार्यरत सहकारी बाजार समितीनाही साहाय्य करीत आहे.[२]

**गोदामाची निर्मिती (दुरुस्ती) नविनीकरण विस्तार :**

महामंडळाच्या आयोजित योजना आणि केंद्राच्या प्रायोजित योजनाच्या अंतर्गत ५० टन आणि १०० टन क्षमतेची ग्रामीण गोदाम बांधकामाच्या हेतुने सामान्यपणे प्राथमिक सहकारी समितीद्वारा २५० ते ५०० टन क्षमतेची विपणन सहकारी संस्थाद्वारा गोदाम बांधकामाच्या हेतुने साहाय्य करणे आणि विशेष बाबीनुसार क्षमतेच्या आधारावर १०००० टनापेक्षा अधिक क्षमतेची मोठा आकारांच्या गोदामासाठी साहाय्य दिले जात आहे.

ग्रामीण स्तरावर प्राथमिक सहकारी संस्थांना कृषी उत्पन्न बाजारसमिती कार्यालय विकास केंद्राच्या रुपात विकसीत करण्यासाठी महामंडळाने कार्यालयात एक विभाग सुरू केला. त्यामध्ये ग्राहकांना वस्तूची विक्री करण्यासाठी दुकान किंवा ग्रामीण गोदाम उपलब्ध केले आहे जिथे आवश्यक आहे त्यांना सचिव किंवा व्यवस्थापक निवासाचे बांधकाम करण्याच्या हेतुने सहाय्यता देत आहे. हे महामंडळ प्राथमिक सहकारी संस्थांना बिगर कर्ज व्यवसायाचा विस्तार करण्याच्या हेतूने विकास आराखडा तयार करण्यासाठी व गोदामांचा पूर्ण उपयोग करण्याच्या हेतुने प्रोत्साहन देत आहे. भांडवल गुंतवणूक अनुदान योजना (ग्रामीण भंडारण योजना) अंतर्गत कोणतीही मर्यादा नसलेले ५० टन कमीत कमी क्षमता असणारी ग्रामीण गोदामांचे बांधकाम, नविनीकरण (दुरुस्ती) व विस्ताराच्या हेतुने साहाय्य केले जात आहे. परंतु अनुदान १०००० टनापेक्षा जास्त क्षमतेच्या गोदामांना अनुदान प्राप्त होणार आहे.

**सहकारी साठवणुकीकरिता भारत सरकारची योजना :**

भारत सरकार कृषि मंत्रालयाने विपणन व निरीक्षण विभाग सुरू केलेला आहे. ग्रामीण गोदामांची निर्मिती, बांधकाम, नविनीकरण व विस्ताराच्या हेतुने भांडवल गुंतवणूक अनुदान योजना, ग्रामीण भंडारण योजनांच्या निधीची अंमलबजावणी या महामंडळाच्या मदतीने सुरू केली आहे.[३]

तक्ता क्र.१

**राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने राज्यनिहाय केलेले अर्थसहाय्य**

(एकत्रित ३१/०३/२०१४ पर्यंत)

| अ.क्र. | राज्ये | गोदामांची संख्या (नगात) | एकोणशी प्रमाण टक्केवारी | शितगृह संख्या | मदत वाटप कोटी रू. | कोटी रु. अनुदान वाटप | एकोणशी प्रमाण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ) | सहकारात कमी विकसीत राज्ये | | | | | | |
| १. | अरुणाचल प्रदेश | १२ | ०.०१७ | - | - | ०.३१० | ०.०३५ |
| २. | आसाम | १०३५ | १.५१६ | ०१ | ०.०५८ | १२.२४० | १.४०९ |
| ३. | बिहार | २९५१ | ४.३२३ | २० (४) | २१.६९२ | ५१.३९० | ५.९१७ |
| ४. | झारखंड | १३९ | ०.२०३ | ०१ | १.०० | ०.४४० | ०.०५० |
| ५. | जम्मू काश्मीर | १७८ | ०.२६० | ०३ | ०.१३५ | ०.४३० | ०.०४९ |
| ६. | मणीपूर | १७६ | ०.२५७ | - | - | ०.८५० | ०.०९७ |
| ७. | मेघालय | १४९ | ०.२१८ | - | - | १.५१० | ०.१७३ |
| ८. | मिझोराम | १२८ | ०१८७ | - | - | ३.३३२ | ०.३८३ |
| ९. | नागालँड | १३० | ०.१९० | १ | ०.१६६ | २.६६० | ०.३०६ |
| १०. | त्रिपुरा | २०५ | ०.३०० | १ (१) | २.३७६ | १०.२६० | १.१८१ |
| ११. | युटीएस | ०५ | ०.००७ | - | - | ०.७०० | ०.०८० |
| उपएकूण (अ) | | ५१०८ | ७.४८३ | | | ८४.१२२ | ९.६७७ |
| ब) | सहकारातील विकसनशील राज्ये | | | | | | |
| १२. | आध्र प्रदेश | ४९६२ | ७.२६९ | ०१ | ३.९६३ | ५०.२५१ | ५.७८६ |
| १३. | छत्तीसगढ | २०२ | ०.२९५ | ०१ | - | ३५.७१४ | ४.११२ |
| १४. | हिमाचला प्रदेश | १८५४ | २.७१६ | ०१ | ०.०८४ | ११.४२५ | १.३१५ |
| अ. क्र. | राज्ये | गोदामांची संख्या (नगात) | एकोणशी प्रमाण टक्केवारी | शितगृह संख्या | मदत वाटप कोटी रू. | कोटी रु.अनुदान वाटप | एकोणशी प्रमाण टक्केवारी |
| १५. | मध्यप्रदेश | ६६६० | ९.७५७ | २४(९) | २५.५८६ | ९७.५३१ | ११.२३१ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १६. | राजस्थान | ५१६८ | ७.५७१ | ०३ | ०.२६८ | ४५.३१८ | ५.२१८ |
| १७. | उत्तरप्रदेश | १०१०० | १४.७९६ | ९५ | २९.८९१ | ११३.८२० | १३.१०७ |
| १८. | उत्तराखंड | १०३ | ०.१५० | - | - | ४.५७१ | ०.५२६ |
| १९. | ओरिसा | २५४६ | ३.७२९ | २१(३) | ७.१४३ | १९.७०० | २.२६८ |
| २०. | प.बंगाल | ३३०९ | ४.८४७ | ६२(१६) | ८५.९८९ | ३१.६७१ | ३.६४७ |
| उपएकूण (ब) | | ३४९०४ | ५१.१३५ | | | ४१०.०० | ४७.२१३ |
| क) | सहकारात विकसीत राज्ये | | | | | | |
| २१. | गुजरात | २३२६ | ३.४०७ | ३ (१) | ०.१०२ | ३४.२१९ | ३.९४० |
| २२. | हरयाना | १९४६ | २.८५० | ४ | २.१९९ | ८८.९०६ | १०.२३८ |
| २३. | कर्नाटक | ६१८९ | ९.०६७ | ०५ | २.७०८ | ६८.४२० | ७.८७८ |
| २४. | केरळ | २३२० | ३.३९८ | - | - | २८.४८५ | ३.२६० |
| २५. | महाराष्ट्र | ५३८९ | ७.८९५ | ०३ | ४.४३३ | ८८.६३२ | १०.२०६ |
| २६. | पंजाब | ४७३४ | ६.९३५ | १६(१) | ०.४४२ | ४४.३६५ | ५.१०८ |
| २७. | तामिळनाडू | ५३४२ | ७.८२६ | २ | १.२०५ | २१.२४० | २.४४५ |
| उपएकूण (क) | | २८२४६ | ४१.३८१ | २६८(३६) | १८९.५३७ | ३७४.२६७ | ४३.०९८ |
| एकूण (अबक) | | ६८२५८ | १००% | ३०४ | - | ८६८.३९० | १००% |

(क्षमता विस्तार संख्या)

स्रोत : राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ अहवाल, २०१३-१४

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने केलेली कामगिरी तक्ता क्र.१ मध्ये दर्शिवली आहे. देशातील (निरनिराळ्या) सर्व राज्यांची सहकारी क्षेत्रातील दिनांक ३१/०३/२०१४ पर्यंतची संचयी एकत्रित गोदामाची संख्या, शितगृहे संख्या व अनुदान वाटप रू.कोटी मध्ये दर्शविले आहे तसेच त्यांचे एकोणाशी प्रमाण सरासरी टक्केवारीमध्ये दर्शविले आहे.

**निष्कर्ष-**

त्याचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, देशातील सहकारी गोदामांना एकूण रु. ८६८.३९० कोटी अनुदान ६८२५८ गोदामांना दिले आहे. सर्वात जास्त गोदामांसाठी अनुदान रु. ११३.८२ कोटी उत्तरप्रदेशला देण्यात आले आहे त्यांची टक्केवारी १३.१० ही आहे. सहकारी गोदामांची संख्या ही सर्वात जास्त उत्तरप्रदेशला असून त्यांची नग संख्या १०१०० इतकी आहे. सहकारी गोदाम अनुदान मिळण्यामध्ये देशात दुस-या स्थानी मध्यप्रदेश आहे. त्या राज्याने एकूण अनुदानापैकी रू.९७.३१ कोटी इतके अनुदान प्राप्त केले आहे. त्याची टक्केवारी ११.२३ ही आहे. देशात सहकारी गोदामाकरिता अनुदान मिळविण्यामध्ये तिसरे स्थान हरियाणा राज्याचे असून त्या राज्याने रू.८८.९० कोटी व १०.२३ टक्के इतके अनुदान मिळविले आहे. देशात सहकारी गोदामाकरिता अनुदान प्राप्त करण्यामध्ये महाराष्ट्राचा चौथा क्रमांक असून रू.८८.६३ कोटी प्राप्त झाले आहे. देशामध्ये पाचवा क्रमांक कर्नाटक राज्यांचा असून त्यांनी रू.६८.४२ कोटी इतके अनुदान प्राप्त केले आहे. त्यांची टक्केवारी ७.८६ ही आहे. देशांतील सहकारी क्षेत्रातील विविध संस्थांना शितगृहासाठी एकूण रू.१८९.५३ कोटी अनुदान दिले आहे त्यांची संख्या ३०४ इतकी आहे. तक्ता क्र.४.८ मधील देशातील विविध राज्यांची सहकारी गोदाम संख्या व शितगृहे संख्या दर्शविली आहे.

तक्ता क्र.१ चा अभ्यास केला असताना असे निदर्शनास आले आहे की, देशात सर्वात जास्त अनुदान शितगृहासाठी रू.८५.९८ कोटी प.बंगाल ने मिळविले आहे. शितगृहांची संख्या विचारात घेता हे राज्य दुस-या स्थानावर आहे. देशात शितगृहासाठी अनुदानप्राप्त करण्यामध्ये दुसरा क्रमांक उत्तरप्रदेशचा आहे. ह्या राज्याने एकुण अनुदानापैकी रु.२९.७१ कोटी अनुदान प्राप्त केले आहे. शितगृहांच्या संख्येमध्ये पहिला क्रमांक उत्तरप्रदेश राज्याचा आहे. तिसरा क्रमांक मध्यप्रदेशचा असून रु.२५.५८ कोटी इतके अनुदान प्राप्त केले आहे तसेच शितगृहाच्या संख्येतही मध्यप्रदेशचा तिसरा क्रमांक आहे. चौथ्या स्थानी बिहार हे राज्य असून रू.२१.६९ कोटी रक्कम २४ शीतगृहासाठी प्राप्त केली आहे. तक्ता क्र.१ मध्ये देशातील राज्ये व गोदामांची संख्या नगात दर्शविली आहे. त्याचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, देशात सर्वात जास्त सहकारी गोदामांची संख्या १०१०० उत्तरप्रदेश मध्ये आहे. दुस-या स्थानी मध्यप्रदेश असून त्याची गोदाम संख्या ६६६० ही आहे. तिस-या स्थानी कर्नाटक राज्य असून त्याची गोदामांची संख्या ६१८९ ही आहे. देशात सहकारी क्षेत्रातील गोदामांच्या संख्येत महाराष्ट्र चौथ्या स्थानी असून त्याची गोदाम संख्या ५३८९ ही आहे. पाचव्या स्थानी तामिळनाडू राज्य असून गोदाम संख्या ५३४२ ही आहे. देशात सर्वात कमी अनुदान उत्तराखंड, जम्मू काश्मीर (०.४३ कोटी), मणीपूर (०.४४ कोटी) या राज्यांनी प्राप्त केले आहे. देशात सर्वात कमी सहकारी गोदामांची संख्या उत्तराखंड १०३ मध्ये आहे. त्यानंतर मिझोराम १२८, नागालॅंड १३०, व झारखंड १३९ या राज्यांचा क्रमांक लागतो.

**संदर्भ**

१. www.ncdc.in/activitieshindi-files/storage.htm
२. www.ncdc.in/activitieshindi-files/coldstoragefruitsvegetables.htm
३. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ, वार्षिक अहवाल, २०१३-१४, पृ.क्र.४८.
४. स्रोत : राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ अहवाल, २०१३-१४